मुंबई, मंगळवार, ४ फेब्रुवारी २०२५ लोकसत्ता

# विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचे काम अंतिम टप्प्यात

लोकसत्ता प्रतिनिधी

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळातून एप्रिल ते मे महिन्यापासून देशांतर्गत प्रवासी आणि मालवाहतुकीच्या पहिल्या उड्डाणाच्या यशस्वी संचलनासाठी सिडको महामंडळाने कंबर कसली आहे. शुक्रवारी सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाची पाहणी करुन प्रत्येक कामाचा आढावा घेतला. पाच तासांहून अधिक काळ विमानतळ प्रकल्पाच्या कार्यालयात चाललेल्या या बैठकीमध्ये विमानतळ टर्मिनलचे काम अंतिम टप्यात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना दिली.

सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शांतनु गोयल, मुख्य महाव्यवस्थापक गीता पिल्लई तसेच सिडको आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडचे अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी सिंघल यांनी सर्व कामे मुदतीत पूर्ण करण्याचे आदेश संबंधितांना दिले. या बैठकीमध्ये एरोनॉटिकल इन्फॉर्मेशन पब्लिकेशन आढावा घेण्यात आला. १७ एप्रिलला विमानतळाचे उदघाटन झाल्यानंतर मे महिन्यात विमानतळातून प्रत्यक्ष प्रवासी व मालवाहतूक सुरू करण्यासाठी सिडकोच्या हालचाली सुरू आहेत.




सिडको मार्फत विमानतळाच्या पश्चिम दिशेकडून मुंबईतून अवघ्या ३५ मिनिटांत एमटीएचएल पुलावरुन येणाऱ्या वाहनांना उलवे सागरी मार्गाने विमानतळापर्यंत येण्यासाठीचा मार्गाची सद्यस्थिती तसेच विमानतळ पूर्व दिशेला तीन वेगवेगळ्या उड्डाणपुलांचे काम सुरू आहे. याच सर्व कामाचा शुक्रवारी सूक्ष्म आढावा व्यवस्थापकीय संचालकांनी घेतला. ही सर्व कामे प्रगतीपथावर सुरु आहेत.

**- शांतनू गोयल,**
सह व्यवस्थापकीय संचालक,
सिडको मंडळ

CIDCO
WE MAKE CITIES

मुंबई, मंगळवार, ४ फेब्रुवारी २०२५ लोकसत्ता



# नवी मुंबई मेट्रो सुसाट

## बेलापूर-पेणधर मेट्रोची लवकरच ताशी ६० प्रति किमी वेगाने धाव

संतोष सावंत, लोकसत्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई मेट्रोचा वेग लवकरच वाढणार असून मेट्रोतील प्रवाशांना गारेगार सुसाट प्रवासाचा अनुभव घेता येणार आहे. सध्या नवी मुंबई मेट्रोचा वेग सरासरी ताशी २५ प्रति किलोमीटर आहे. नुकतेच नवी दिल्लीच्या रेल्वे सुरक्षा विभागाने (कमिशनर ऑफ मेट्रो रेल्वे सेफ्टी -सीएमआरएस) नवी मुंबई मेट्रोच्या बेलापूर ते पेणधर या पहिल्या मार्गिकेवरील वेगाची चाचणी केली. ही चाचणी यशस्वी झाल्याचे अद्याप प्रमाणपत्र महामेट्रोला मिळाले नसले तरी सिडकोच्या विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ही चाचणी यशस्वी झाली असून लवकरच नवी मुंबई मेट्रो ताशी ६० प्रति किलोमीटरने सुस्साट धावणार आहे. यामुळे मेट्रोने प्रवास करणाऱ्यांना जलदगतीने अंतर कापता येणार आहे.

सिडको महामंडळाने बांधलेल्या नवी मुंबई मेट्रोचे संचलन सध्या महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) कंपनीमार्फत सुरू आहे. आतापर्यंत ६० लाख प्रवाशांनी या मेट्रोसेवेचा लाभ घेतला आहे. सिडकोला तिकीट दरातून १४ कोटी ५० लाख रुपये (पान ३वर)

### मेट्रोची वैशिष्ट्ये

- बेलापूर ते पेणधर या ११.१ किलोमीटरच्या अंतरावर ११ स्थानके
- आतापर्यंत ६० लाख प्रवाशांनी घेतला मेट्रोसेवेचा लाभ
- सिडकोला तिकीट दरातून १४ कोटी ५० लाख रुपये महसूली उत्पन्न
- २० जानेवारीपासून सर्वाधिक गर्दीच्या वेळांमध्ये दर दहा मिनिटांनी मेट्रोची फेरी
- उर्वरित वेळांमध्ये बेलापूर व पेणधर येथून दर १५ मिनिटांनी मेट्रो

## नवी मुंबई मेट्रो सुसाट

(पान १वरून) महसूली उत्पन्न मिळाले आहे. बेलापूर ते पेणधर या ११.१ किलोमीटरच्या अंतरावर ११ विविध मेट्रो स्थानके आहेत. २० जानेवारीपासून सिडकोने मेट्रो मार्गावर सर्वाधिक गर्दीच्या वेळांमध्ये दर दहा मिनिटांनी मेट्रोची फेरी सुरू केली आहे. गर्दीच्या वेळेत बेलापूर येथून सकाळी साडेसात ते १० वाजता आणि सायंकाळी साडेपाच ते आठ वाजेपर्यंत तर पेणधर येथून सकाळी सात ते साडेनऊ आणि सायंकाळी पाच ते साडेसात दरम्यान दर दहा मिनिटांनी मेट्रोची फेरी झाली आहे. गर्दीच्या वेळा वगळता उर्वरित वेळांमध्ये बेलापूर व पेणधर येथून दर १५ मिनिटांनी मेट्रो धावत आहे.

नवी मुंबई मेट्रोला नुकतेच आयएसओ ९००१ - २०१५ हे मानांकन मिळाले आहे. गुणवत्ता व्यवस्थापन, व्यावसायिक स्वास्थ्य तथा सुरक्षा व्यवस्थापन आणि पर्यावरण व्यवस्थापन प्रणाली ही तीनही आयएसओ मानांकने प्राप्त करणारी राज्यातील एकमेव मेट्रो सेवा आहे.

जानेवारी महिन्यात नवी मुंबई मेट्रोच्या गतीची चाचणी घेण्यात आली असून अद्याप चाचणीचे प्रमाणपत्र सिडकोला मिळाले नाही. परंतु मेट्रोला प्रतिताशी ८० किलोमीटरच्या वेगाचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सरळ मेट्रोच्या मार्गिकेवर जास्तीत जास्त प्रतिताशी ७० किलोमीटरच्या वेगाने मेट्रो धावू शकेल. मात्र मेट्रोच्या वळण मार्गावर मेट्रोची गती कमी राहील.

मेट्रोच्या वेगचाचणीचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर स्वयंचलित धावणारी संचलनाचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर मेट्रोची गती वाढविली जाणार आहे. पुढील दीड महिन्यात वेग चाचणीचे प्रमाणपत्र मिळण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर नवी मुंबई मेट्रोतून प्रवाशांना अवघ्या पंधरा मिनिटांत बेलापूर ते पेणधर या मार्गिकेवर प्रवास करता येईल.




सकाळ मुंबई, मंगळवार, ४ फेब्रुवारी २०२५

# तळोजामधील उद्यानांची डागडुजी

**खारघर :** सिडकोकडून उद्यानातील खेळण्यांची दुरुस्ती करण्यात येत आहे.

खारघर, ता. ३ (बातमीदार) : तळोजा फेज एक वसाहतीच्या उद्यानांमधील खेळणी जुनाट आणि मोडकळीस आली होती. याप्रकरणी नागरिकांच्या तक्रारीनुसार सिडकोच्या माध्यमातून उद्यानातील खेळण्यांची डागडुजी करण्यात येत आहे.

सिडकोने तळोजा फेज वसाहतमधील काही सेक्टरमध्ये मैदान तर काही ठिकाणी उद्यानासाठी भूखंड राखीव ठेवले होते. यामध्ये उद्यानांची निर्मिती करण्यात आली आहे. सेक्टर नऊ आणि १४ मधील उद्यानात नागरिकांना चालण्यासाठी पदपथ तसेच मुलांसाठी खेळणी बसविण्यात आल्या आहेत. दरम्यान, पनवेल पालिकेकडे तळोजा वसाहत हस्तांतरण केल्यावर सिडकोने उद्यानाकडे दुर्लक्ष केले. दरम्यान, या दोन्ही उद्यानातील खेळणी मोडकळीस आली आहेत, तर काही उद्यानातील खेळणी तुटली असून, काहींची दयनीय अवस्था झाली आहे.